**प्रेस नोट दिनांक २०/०७/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**चोरीचा गुन्हा उघडकीस आणले बाबत.**

चंदननगर पो.स्टे. हद्दीत राहाणारे श्री. उदयभानु कृपासिंधु शेट्टी, रा. थिटेवस्ती, खराडी, पुणे हे दिनांक १८/०७/१९ रोजी १०.३० वा. ते दि. १९/०७/१९ रोजी पहाटे ०३.०० वा. चे दरम्याने त्यांचे राहाते घराचा दरवाजा उघडा ठेवुन मित्रासह झोपले असतांना त्यांचा उशाजवळ ठेवलेला ओपो मोबाईल हँडसेट ए – ५ मॉडेलचा किंमत रु. १०,०००/- चा चोरीस गेलेला होता. त्याबाबत फिर्यादी हे तक्रार देणेसाठी पोलीस ठाणेस आले असता त्यांना पोलीसांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला मोबाईल हँडसेट दाखविला. त्यांनी तो मोबाईल त्यांचाच असलेची खात्रीशीर माहिती सांगितली. तसेच त्यांना सदर मोबाईल चोरणारा आरोपी - मंगेश सुरेश उकिरडे, वय १९ वर्षे, रा. लेन नं. १, थिटेवस्ती, खराडी, पुणे हा दाखवुन माहिती दिली असता त्यांनी सदर चोरटयाविरुध्द तक्रार दिलेवरुन गुरनं. २९२/१९, भा.द.वि. कलम ३८० प्रमाणे दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. आरोपीकडुन फिर्यादी यांचा मोबाईल हँडसेट खराडी मार्शलचे कर्मचारी पोशि. ८९६०, समिर शेख व पोशि. ८२८५, गणेश आव्हाळे यांनी जप्त करुन ताब्यात घेवुन सदरची चांगली कामगिरी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. ५८२२, रोकडे हे करीत आहेत.

सदरची चांगली कामगिरी वपोनि. कृष्णा इंदलकर व पोनि. गुन्हे - सत्यवान पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोशि. समिर शेख व पोशि. गणेश आव्हाळे यांनी केलेली आहे.